# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 13 May 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १३ मे २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात आज मतदान–मराठवाड्यात जालना, बीड ,औरंगाबाद लोकसभा मतदार संघासह राज्यातल्या ११ मतदार संघांचा समावेश
- छत्रपती संभाजीनगर तसंच जालना इथले दोन तरुण पाच पिस्तुलांसह धुळ्यात जेरबंद
- अवैध गर्भलिंग निदान करणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थिनीला छत्रपती संभाजीनगरात अटक

आणि

- नांदेड इथं अवकाळी पावसात वीज पडून एकाचा मृत्यू–लातूर तसंच धाराशिव जिल्ह्यातही पावसाची हजेरी

****

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात नऊ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ९६ मतदारसंघांत, आज मतदान होत आहे. यात मराठवाड्यातल्या जालना, बीड आणि औरंगाबाद लोकसभा मतदार संघासह, राज्यातल्या पुणे, शिरुर, मावळ, अहमदनगर, शिर्डी, नंदुरबार, जळगाव आणि रावेर या एकूण ११ मतदारसंघाचा समावेश आहे.

मतदारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदान केंद्रावर मतदार ओळखपत्रासह, छायाचित्र असलेली ओळखपत्र पुरावा म्हणून दाखवता येणार आहेत. यामध्ये आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन चालक परवाना, दिव्यांग व्यक्ती ओळखपत्र,

कामगार आरोग्यविमा स्मार्ट कार्ड, पासपोर्ट, मनरेगा रोजगार ओळखपत्र, छायाचित्रासह बचत खातेपुस्तक, आदी पुराव्यांचा समावेश आहे.

मतदारांना मतदार यादीत आपलं नाव शोधण्यासाठी निवडणूक विभागाच्या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध आहे. त्याशिवाय मोबाइल एसएमएसद्वारे मतदारांना ही सुविधा देण्यात आली आहे. यासाठी मतदारांनी मोबाइलच्या मेसेज बॉक्समध्ये, इंग्रजीत ई सी आय स्पेस आणि त्यानंतर आपला मतदार ओळखपत्राचा क्रमांक लिहून, १९५० या क्रमांकावर मेसेज पाठवायचा आहे. या मेसेजच्या उत्तरात मतदार यादी क्रमांक आणि मतदार क्रमांक तत्काळ पाठवला जातो.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात तीन हजार ८५ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रियेला नुकताच प्रारंभ झाला आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सर्व मतदारांना निर्भयपणे मतदान करण्याचं आवाहन केलं...

***नमस्कार, औरंगाबाद लोकसभा मतदार संघ व जालना लोकसभा मतदारसंघामधये मतदानाला प्रारंभ झालेला आहे. माझं समस्त मतदार बंधू भगीनींना विनम्र आव्हान आहे जो मतदानाचा अधिकार आपल्याला घटनेनं दिलेला आहे त्या अधिकारांचा वापर करा, आपलं कर्तव्य पार पाडा, आणि मतदान केंद्रावर जावून मतदान आवश्य करा.***

औरंगाबाद लोकसभा मतदार संघात १७ हजार ७४० अधिकारी कर्मचारी जिल्ह्यातल्या तीन हजार ८५ मतदान केंद्रांचं संचालन करत असून, सुमारे तीन हजारावर प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा राखीव पथकात समावेश आहे. जिल्ह्यात अकरा पर्यावरणस्नेही मतदान केंद्रं आहेत.

बीड लोकसभा मतदार संघातल्या दोन हजार ३५५ मतदान केंद्रापैकी एक हजार १७७ मतदान केंद्राचं थेट प्रक्षेपण म्हणजेच वेब कास्टिंग होणार आहे. सर्व मतदान केंद्रांवर अत्यावश्यक सुविधांसह महिला मतदारांच्या बालकांसाठी पाळणाघरांची व्यवस्थाही करण्यात आली आहे.

****

जालना जिल्ह्यातल्या एक हजार ३६ मतदान केंद्रावर वेब कास्टिंग करण्यात येणार असून, कुठलाही अनुचित प्रकार घडू नये याकरता पोलीस प्रशासनाकडून आवश्यक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. याशिवाय, मतदान केंद्राध्यक्षांना विविध माहितीची नोंद ठेवण्यासाठी जालना जिल्हा प्रशासनाने अभिनव कल्पना राबवली

आहे. या तिन्ही लोकसभा मतदार संघातल्या विशेष व्यवस्थेचा आमच्या प्रतिनिधींनी घेतलेला संक्षिप्त आढावा…

*छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या नऊ विधानसभा मतदार संघांपैकी औरंगाबाद मध्य, पूर्व आणि पश्चिम तसंच वैजापूर, गंगापूर आणि कन्नड या सहा विधानसभा मतदार संघातले २० लाख ५९ हजारावर मतदार औरंगाबाद लोकसभा मतदार संघासाठी तर फुलंब्री, पैठण आणि सिल्लोड या तीन विधानसभा मतदार संघातले १० लाख पाच हजारावर मतदार जालना लोकसभा मतदार संघात मतदानाचा हक्क बजावत आहेत. औरंगाबाद लोकसभा मतदार संघात जिल्हा प्रशासनाकडून यंदा प्रथमच, मतदान पथकांच्या वाहतुकीवर लक्ष ठेवण्यासाठी पी एम एस 24 या मोबाईल ॲपचा वापर केला जात आहे.*

**हर्षवर्धन दीक्षित, आकाशवाणी बातम्यांसाठी छत्रपती संभाजीनगर**

***

*बीड लोकसभा मतदारसंघात एकूण २ हजार ३५५ मतदान केंद्र आहेत. यामध्ये शहरी भागात १७४ तर ग्रामीण भागात १ हजार ३०५ असणार आहे. ग्रामीण भागातल्या २२ मतदान केंद्रांवर मोबाईल नेटवर्कची सुविधा नसल्याने तिथल्या मतदान केंद्र अध्यक्षांना जिल्हा प्रशासनाने संपर्कासाठी वॉकी टॉकी ची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. जिल्ह्यातल्या ५० टक्के मतदान केंद्रावरून वेब कास्टिंग केलं जाणार असून, जिल्ह्यातली ५५ महिला मतदान केंद्रं, ११ दिव्यांग संचलित मतदान केंद्रं तर २२ युवा अधिकाऱ्यांकडून संचलित मतदान केंद्र आहेत. या सर्व मतदान केंद्रांवर २१ लाख ४२ हजार मतदारांना मतदानाचा हक्क बजावता येणार आहे.*

**आकाशवाणीसाठी बीड हून रवी उबाळे**

**

*मतदान केंद्राध्यक्षांना मतदान केंद्रावर विविध महत्त्वपूर्ण कामांच्या नोंदी ठेवाव्या लागतात. यामध्ये मतदान पथकास सर्व साहित्य मिळालं का, मतदान यंत्रांची जोडणी झाली का, अभिरूप मतदान करून पाहिलं का, मतदान प्रक्रिया वेळेवर सुरू झाली का, आवश्यक सर्व अहवाल तयार केले का, अशा विविध माहितीसह सकाळी सात ते सायंकाळी सहापर्यंतच्या*

*प्रत्येक टप्प्यातील मतदानाची टक्केवारीही लेखी स्वरुपात नोंदवावी लागते. जालन्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी या नोंदींसाठी वेगळी संकल्पना राबवली आहे. मतदान पथकाला दिलेल्या पाणी थंड ठेवणाऱ्या बाटल्यांवर या सगळ्या नोंदी मार्करद्वारे करता येणार आहेत. त्यामुळे मतदान प्रक्रियेतला कोणताही टप्पा सुटण्याची शक्यता नाही. जिल्हाधिकारी पांचाळ यांच्या या नवीन प्रयोगाचं भारत निवडणूक आयोगानेही कौतुक केलं आहे.*

**आकाशवाणी बातम्यांसाठी बाबासाहेब म्हस्के जालना**

****

पक्षविरोधी कारवाया केल्याप्रकरणी नाशिकचे काँग्रेस जिल्हाध्यक्ष तुषार शेवाळे यांना सहा वर्षांसाठी काँग्रेस पक्षातून निलंबित करण्यात आलं आहे. शेवाळे यांनी काल धुळे इथल्या कार्यक्रमात भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

****

'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात आजच्या भागात आपण 'मुंबई वायव्य' लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून संध्याकाळी सव्वा सात वाजता प्रसारित होणारा हा कार्यक्रम सामाजिक संपर्क माध्यमांवरूनही ऐकता येईल.

****

धुळे जिल्ह्यात काल दोन जणांना पाच गावठी पिस्तूल आणि जिवंत काडतुसांसह पोलिसांनी ताब्यात घेतलं. गोपनीय माहितीच्या आधारे शिरपूर पोलिस निरीक्षक श्रीराम पवार यांनी शिरपूर तालुक्यात कामखेडा फाट्याजवळ सापळा लावला होता, यावेळी मध्यप्रदेशातून दुचाकीवरून येणाऱ्या दोघा संशयितांना थांबवलं असता, त्यांनी दुचाकी सोडून पसार होण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतल्याचं पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी सांगितलं. या दोघांपैकी एक जण छत्रपती संभाजीनगरचा तर दुसरा जालना इथला रहिवासी असल्याचं तपासात समोर आलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगरमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थिनी अवैध गर्भलिंग निदान चाचणी करत असल्याचा प्रकात काल उघडकीस आला. साक्षी थोरात असं या तरुणीचं नाव असून काल सापळा रचून तिच्यासह सहा जणांना ताब्यात घेऊन गुन्हा

नोंदवण्यात आला. याठिकाणी चाचणीसाठी आलेल्या एका गर्भवतीसह १२ लाख ७८ हजार रुपयांची रोकड, दहा मोबाईल, टॅब, पोर्टेबल मशीन आदी साहित्य जप्त करण्यात आलं.

****

नांदेड शहरासह जिल्ह्यातल्या विविध भागात काल सायंकाळी जोरदार पाऊस झाला. या पावसात हदगाव तालुक्यात धानोरा इथं शेतात काम करणारे वृद्ध शेतकरी देवराव वानखेडे यांचा अंगावर वीज पडून मृत्यू झाला. याशिवाय विविध ठिकाणी वीज कोसळून पाच बैलांसह इतर पशुधनही दगावलं आहे.

लातूर जिल्ह्यात निलंगा, औसा तालुक्यासह अनेक भागात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला. वादळी वाऱ्यांमुळे औसा तालुक्यातल्या किल्लारी-लामजना परिसरात काही ठिकाणी विद्युत तारा तुटल्याने या भागातला विद्युत पुरवठा खंडित झाला होता.

धाराशिव जिल्ह्यातही काल जोरदार पाऊस झाला. उमरगा तालुक्यात या पावसामुळे अनेक गावात नदी नाले वाहते झाले, मात्र आंबा कांदा यासह अनेक फळ बागा आणि पिकांचं या पावसामुळे मोठं नुकसान झालं.

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात गेले दोन दिवस पाऊस झाला. यामुळे ग्रामीण भागात आंबा आणि डाळींब बागांना या पावसाचा सर्वाधिक फटका बसल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

येत्या २४ तासांत छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्याला हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट तर परभणी, बीड आणि नांदेड जिल्ह्यासाठी यलो अलर्ट दिला आहे. उद्या १४ मे रोजी छत्रपती संभाजीनगर, जालना जिल्ह्याला यलो अलर्ट देण्यात आला असून, बीड जिल्ह्याला दोन दिवस यलो अलर्ट देण्यात आला आहे. या काळात मराठवाड्यात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा, तसंच गारांसह पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

****

जागतिक परिचारिका दिवस काल सर्वत्र साजरा झाला. आद्य परिचारिका फ्लॉरेन्स नाईटिंगेल यांच्या जन्मदिनाचं औचित्य साधत हा दिवस साजरा केला जातो. छत्रपती संभाजीनगर इथल्या घाटी रुग्णालयात या निमित्तानं विशेष कार्यक्रम घेण्यात आला. हिंगोलीतही शासकीय नर्सिंग महाविद्यालयात परिचारिका दिवस साजरा झाला. नांदेड जिल्ह्यात वैद्यकीय अधिक्षक डॉ प्रताप चव्हाण यांच्या मार्गदर्शनानुसार

भोकर ग्रामीण रुग्णालयातही फ्लोरोन्स नाइटिंगेल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

****

समाजाच्या उन्नतीसाठी जी माणसं झिजली त्यात गोविंदभाई श्रॉफ यांचं नाव अग्रस्थानी असून, कर्तृत्व भावनेतून साक्षरता अभियानाकडे पाहण्याची व्यापक दृष्टी गोविंद भाईंकडे होती, असं प्रतिपादन, ज्येष्ठ साहित्यिक ऋषिकेश कांबळे यांनी केलं आहे. काल छत्रपती संभाजीनगर इथं, `साक्षरता अभियानातून कौशल्याचा ध्यास–पद्मविभूषण गोविंद भाई श्रॉफ`, या पुस्तकाचं प्रकाशन कांबळे यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

****